अ. महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998 अंतर्गत विवाह नोंदणीसाठी पक्षकारांकडून प्रक्रीया खालीलप्रमाणे असते.

1. विवाह ज्ञापनाच्या **'नमुना ड'** मध्ये माहिती भरणे
2. त्यास रु.100/- चे कोर्ट फी स्टॅम्प (कोर्ट फी लेबल) चिकटविणे आवश्यक.
3. विवाह नोंदणीचे ज्ञापन पत्नी किंवा पती ज्या विवाह निबंधकाचे कार्यक्षेत्रात राहत असतील त्या विवाह निबंधकासमोर सादर करणे
4. विवाह ज्ञापनातील पक्षकार (वधू व वर) आणि तीन साक्षीदार व्यक्तीशः विवाह निबंधकासमोर उपस्थित राहून विवाह ज्ञापनावर स्वाक्षरी करणे
5. तसेच विहीत केलेली विवाह नोंदणी फी भरणे

ब. महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम 1998 अंतर्गत विवाह नोंदणीसाठी विवाह निबंधकाकडून प्रक्रीया खालीलप्रमाणे असते.

1. विवाह ज्ञापनाचा **'नमुना ड'** सादर केल्यानंतर त्याची पडताळणी करून दाखल करणे
2. पक्षकार (वधू व वर) आणि तीन साक्षीदार यांच्या ओळखीबाबत खात्री करणे
3. खात्री पटल्यानंतर महाराष्ट्र विवाह नोंदणी अधिनियम 1998 मधील कलम 6 अन्वये विहीत केलेला '**नमुना इ'** मध्ये विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे
4. त्याची एक प्रत विवाह महानिबंधक यांचेकडे पाठविणे